# मजेत शिकूया मराठी

## इयत्ता पहिली

(विद्यार्थी व शिक्षकांसाठी पाठ्येतर पूरक पुस्तिका)



• चित्र पाहा. सांगा.







• चित्रांना गोलांतील योग्य रंग द्या.



• चित्रे रंगवा.



आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

Y9FX8R

# मजेत शिकूया मराठी

## इयत्ता पहिली

### अमराठी माध्यमांच्या शाळांतील

(हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगू, सिंधी इ.)

### विद्यार्थी व शिक्षकांसाठी पाठ्येतर पूरक पुस्तिका



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

प्रथमावृत्ती : २०१४
पाचवे पुनर्मुद्रण : २०१९

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा समिती :**

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, अध्यक्ष
प्रा. रा. रं. बोराडे, सदस्य
इरगोंडा पाटील, सदस्य
फादर फ्रान्सिस दिब्रिटो, सदस्य
वाहरू सोनवणे, सदस्य
प्रा. प्रज्ञा दया पवार, सदस्य
डॉ. सुभाष सावरकर, सदस्य
किशोर दरक, सदस्य
श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख
(सदस्य–सचिव)

**मराठी भाषा समिती – कार्यगट सदस्य**

| | |
|---|---|
| हरी गंगाधर नारलावार | डॉ. संध्या पवार |
| प्रा. सर्जेराव रणखांब | श्रीकांत चौगुले |
| श्रीमती रेणू दांडेकर | पद्माकर कुलकर्णी |
| प्रा. जयवंत पाटील | शिवा कांबळे |
| डॉ. रोहिणी गायकवाड | नीलेश निमकर |
| डॉ. मंदा नांदूरकर | एकनाथ आव्हाड |
| प्रा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो | अतुल कुलकर्णी |
| प्रा. डॉ. सुनीता सुळेकर | वेच्या रूध्या गावित |

| | | |
|---|---|---|
| **संयोजन** | : | श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख<br>प्र. विशेषाधिकारी, मराठी |
| **चित्रकार** | : | श्री. राजेंद्र गिरधारी |
| **मुखपृष्ठ** | : | श्री. राजेंद्र गिरधारी |
| **अक्षरजुळणी** | : | भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. |
| **निर्मिती** | : | सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी<br>संदीप आजगांवकर, निर्मिती अधिकारी |
| **कागद** | : | ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह |
| **मुद्रणादेश** | : | N/PB/2019-20/ QTY. 75,000 |
| **मुद्रक** | : | M/s Mamta Offset, Ahmednagar |

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
**नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

# प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांसह सर्व अमराठी माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून मराठी भाषा विषय अनिवार्य करण्याचा धोरणात्मक निर्णय सन २००९ मध्ये घेतला. 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२'मध्येही याच धोरणानुसार, अनिवार्य मराठी हा विषय इयत्ता पहिलीपासून समाविष्ट करण्यात आला आहे. इयत्ता पहिली व दुसरीच्या स्तरावर मराठी हा विषय शिक्षकांनी श्रवण, भाषण व संभाषण या कौशल्यांच्या स्वरूपात शिकवावा आणि त्या विषयासाठी 'पाठ्यपुस्तक' असू नये अशी अपेक्षा आहे; म्हणून इयत्ता पहिलीकरिता मराठी विषयाची ही छोटेखानी पूरक साहित्य पुस्तिका पाठ्यपुस्तक मंडळाने तयार केली आहे.

या पूरक पुस्तिकेमध्ये गाणी, गोष्टी दिल्या आहेत. तसेच परिचित, अपरिचित पक्षी, पाळीव प्राणी, जंगली प्राणी, फुले, फळे, झाडे यांचा रंगीत चित्रे व शब्दांतून परिचय करून दिलेला आहे. काही सूचना व कृती दिल्या आहेत. शिक्षकांना अध्यापन करणे सुलभ जावे यासाठी पुस्तिकेच्या शेवटी 'दिशा अध्ययन-अध्यापनाची' या शीर्षकाखाली मार्गदर्शन केले आहे. मराठी भाषेचे अध्ययन-अध्यापन परिणामकारक व दर्जेदार होण्यासाठी त्याचा उपयोग करावा.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून ही पुस्तिका तयार झाली आहे. ही पुस्तिका जास्तीत जास्त बिनचूक व दर्जेदार व्हावी यासाठी राज्याच्या विविध भागांतील अमराठी माध्यमांच्या शाळांतील शिक्षकांकडून तिचे समीक्षण करून घेण्यात आले आहे. समीक्षकांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून मराठी भाषा समितीने या पुस्तिकेला अंतिम स्वरूप दिले आहे. मराठी भाषा समिती व कार्यगट सदस्य, संबंधित समीक्षक, चित्रकार या सर्वांचे मंडळ मनःपूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तिकेचे स्वागत करतील अशी आशा आहे.

(चं.रा.बोरकर)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे.
दिनांक : १४ नोव्हेंबर, २०१३

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | सरी (गाणे) | १ |
| २. | दोघेही जिंकू (चित्रकथा) | २ |
| ३. | करूया स्वागत | ३ |
| ४. | खेळ खेळूया | ४ |
| ५. | ऐकूया, करूया | ५ |
| ६. | घंटा वाजे (गाणे) | ६ |
| ७. | चतुर कावळा (चित्रकथा) | ७ |
| ८. | जोडीदार शोधा | ८ |
| ९. | माझा हात (गाणे) | ९ |
| १०. | पाहूया, सांगूया | १० |
| ११. | कशासाठी, कोणते अवयव ? | ११ |
| १२. | ओळख आपल्या वर्गाची | १२ |
| १३. | झाडे लावूया | १३ |
| १४. | ओळखा माझा रंग | १४ |
| १५. | गमतीजमती | १५ |
| १६. | ओळख फळांची | १६ |
| १७. | दे रे भाऊ, माझा खाऊ (गाणे) | १७ |
| १८. | पक्ष्यांचे जग | १८ |
| १९. | ओळख प्राण्यांची | १९ |
| २०. | प्राण्यांचे जग | २० |
| २१. | आम्हांलाही खेळायचंय | २१ |
| २२. | आरसा रडला, आरसा हसला | २२ |
| २३. | माझी ओळख | २३ |
| २४. | माझे मित्र | २४ |
| २५. | माझे कुटुंब | २५ |
| २६. | माझे पान | २६ |
| २७. | चित्रात काय ? | २७ |
| २८. | ओळखा पाहू ! | २८ |
| • | उद्‌दिष्टे, दिशा अध्ययन–अध्यापनाची | २९ |

# १. सरी

Y9PTAE

- गाणे ऐका. म्हणा.

टप्‌टप्‌ थेंब
सरसर सरी,
गाडगे, मडके
भरभर भरी.

सरीवर सरी
झेलते पोर,
थुईथुई नाचे
रानात मोर.



# २. दोघेही जिंकू


Y9YPC2

- चित्रे पाहा. चित्रांत काय काय दिसते ते सांगा.


१




२



३



४



**पुढे काय झाले असेल ?**

- गोष्ट ऐका. गोष्ट सांगा.

# ३. करूया स्वागत

● पाहा. ऐका. सांगा.

①




②




● अभिवादनाचा प्रसंग सादर करावा.

# ४. खेळ खेळूया

YLLTU9

● पाहा. ऐका. सांगा.













● ऐका. पाहा. म्हणा. कृती करून दाखवा.

# ५. ऐकूया, करूया

• चित्रे पाहा. चित्रांतील मुलाला/मुलीला काय करायला सांगितले आहे ते ओळखा.



हसा.



उभे राहा.




वाचा.



रडा.



बसा.



लिहा.



खा.



पळा.



उड्या मारा.

• वरील चित्रांखाली दिलेल्या क्रियांची नावे ऐका. पाहा. म्हणा. कृती करा.

YLVPVH

# ६. घंटा वाजे

- गाणे ऐका. म्हणा.
- चित्र पाहा. माहिती ऐका. सांगा.

घंटा वाजे घण् घण् घण्
झांज वाजे झन् झन् झन्
ढोल वाजे ढुम् ढुम् ढुम्
घुंगरू वाजे छुम् छुम् छुम्
घण्घण् झन्झन्
ढुम्ढुम् छुम्छुम्




- चित्रातील वाद्ये पाहा. नावे ऐका व पाहा. सांगा.
- आवाज ऐका. आवाज काढा.
- खालील वाद्यांची नावे सांगा. दाखवा.


YM5KXJ



घंटा



घुंगरू



ढोल



झांज

- तुम्ही पाहिलेल्या वाद्यांची नावे सांगा. चित्रे जमवा.

YHEGZ7


# ७. चतुर कावळा

- चित्रे पाहा. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते सांगा.

१




२




३




४




- गोष्ट ऐका. गोष्ट सांगा.
- चित्रे ओळखा. नावे पाहा. नावे दाखवा. सांगा.



कावळा



नळी



माठ



शहाळे





मुलगा

# ८. जोडीदार शोधा


YMND1U

- चित्रे पाहा. चित्र-शब्द जोड्या रेषेने दाखवा.


ताट


बॉल



कंगवा


ब्रश



वही



डोळे


ताट
बॉल
कंगवा
बॅट
ब्रश
आरसा
वही
चश्मा
वाटी
टूथपेस्ट
पेन्सिल
डोळे


आरसा


बॅट


वाटी


टूथपेस्ट


पेन्सिल


चश्मा


- पाहा. ऐका. म्हणा. शब्द दाखवा.

# ९. माझा हात

YMX93H

● गाणे ऐका. म्हणा.

माझा हात, माझा हात.
दात घासायला माझा हात.
माझा हात, माझा हात.
खाऊ खायला माझा हात.
माझा हात, माझा हात.
दार उघडायला माझा हात.
माझा हात, माझा हात.
कचरा काढायला, माझा हात.
माझा हात, माझा हात.
काम करायला माझा हात.
माझा हात, माझा हात.
मदत करायला माझा हात.





● चित्र पाहा. हातांची कामे सांगा.

# १०. पाहूया, सांगूया

YN7555

- चित्रे पाहा. कोण काय करत आहे ते सांगा.





- चित्रे पाहा. शरीराच्या अवयवांची नावे सांगा.

डोळे


नाक

कान

पाय


हात

तोंड

- वरील चित्रांतील शरीराचे अवयव व त्यांची नावे सांगा. दाखवा.

# ११. कशासाठी, कोणते अवयव ?

● पाहा. ऐका. सांगा.

कान


पाय

नाक

हात

डोळे

तोंड



● वरील अवयवांचे आणखी उपयोग/कामे सांगा.

● चित्रे पाहा. कोणत्या अवयवांचा उपयोग केला ते सांगा.











YNG16S

# १२. ओळख आपल्या वर्गाची


- चित्र पाहा.
  चित्रात काय काय
  दिसते ते सांगा.

- चित्राची माहिती ऐका.
  सांगा.


YNPH8F




- चित्रे ओळखा. नावे पाहा. ऐका. सांगा. दाखवा.




पुस्तक



फळा




बाक




वही




दप्तर



पाटी




डस्टर-खडू



टेबल-खुर्ची

# १३. झाडे लावूया

- चित्रे पाहा. बोला.









# १४. ओळखा माझा रंग

YP8NBQ


- पाहा. सांगा.



हिरवा



लाल




काळा



पांढरा




पिवळा

# १५. गमतीजमती


- चित्रे पाहा. गमती शोधा. सांगा.















- पाहा. ऐका. म्हणा. नावे दाखवा.



कासव



पक्षी



नारळ



आगगाडी




बस

# १६. ओळख फळांची

- नावे ओळखा. रेघेने जोडा.



केळीचे झाड








नारळाचे झाड







पपईचे झाड



आंब्याचे झाड




Z1VSTX

# १७. दे रे भाऊ, माझा खाऊ

● गाणे ऐका. म्हणा.

Z25NVK

चिमणीची चिवचिव
कावळ्याची कावकाव
दे रे भाऊ, माझा खाऊ.

मांजराची म्याँवम्याँव
कुत्र्याची भूऽभूऽ
दे रे भाऊ, माझा खाऊ.

पोपटाची मिठूमिठू
कोंबड्याची कुकूचकूऽऽ
दे रे भाऊ, माझा खाऊ.


कबुतराची गुटर्रऽगूंऽ
कोकिळाची कुहूऽकुहूऽ
दे रे भाऊ, माझा खाऊ.



# १८. पक्ष्यांचे जग

Z2EJX8

- चित्रे पाहा. ओळखा. नाव ऐका. सांगा. नाव दाखवा.



मिठूमिठू

पोपट

मियाँवऽ मियाँवऽ




मोर



कुहूऽ कुहूऽ

कोकीळ

क्वॅक् क्वॅक्




बदक




कुकूचकूऽऽ

कोंबडा

कावकाव



कावळा



गुटर्रऽगूंऽ गुटर्रऽगूंऽ

कबुतर

चिवचिव




चिमणी

- पक्ष्यांची चित्रे जमवा. वहीत चिकटवा. त्याखाली शिक्षकांच्या मदतीने नावे व आवाजांच्या नामपट्ट्या चिकटवा.


# १९. ओळख प्राण्यांची

Z2NFYV

- चित्रे पाहा. प्राण्यांची नावे सांगा.




गाय




मासा



वाघ




म्हैस




कासव



ससा




घोडा




बेडूक




सिंह



उंट



मगर



हत्ती

- प्राण्यांची नावे ऐका. वरील चित्रांत प्राणी दाखवा. त्यांची नावे दाखवा.

# २०. प्राण्यांचे जग

Z2XC1I

- चित्रे पाहा. ओळखा. नावे ऐका. सांगा. नावे दाखवा.

कुत्रा




भूऽभूऽ

बेडूक




डराँव डराँव

शेळी



बेंऽबेंऽ

मांजर




म्याँवम्याँव

- आवाज ऐका. नावे ओळखा. चित्रे दाखवा. आवाज काढा.
- प्राण्यांची चित्रे जमवा. वहीत चिकटवा. शिक्षकांच्या मदतीने चित्रांखाली नावे लिहा.

# २१. आम्हांलाही खेळायचंय

Z37836

- पाहा. बोला.



# २२. आरसा रडला, आरसा हसला

Z3G44T

• पाहा. बोला.



• पाहा. बोला.




• तुम्ही आरशासमोर उभे राहा. आरसा काय म्हणेल ते सांगा.

# २३. माझी ओळख

Z3PZ6G

● चित्रे पाहा. ऐका. सांगा.




● ऐका. म्हणा. (विद्यार्थ्यांनी स्वत:चे, शाळेचे, वर्गाचे व मित्र-मैत्रिणीचे नाव वापरून वाक्ये सांगावी.)

माझे नाव .................................................. आहे.

माझ्या शाळेचे नाव.............................................. आहे.

हा माझा .............. चा वर्ग आहे.

माझ्या मित्राचे/मैत्रिणीचे नाव ................................ आहे.

# २४. माझे मित्र

● पाहा. ऐका. सांगा.






Z3YV84

| | | | |
|---|---|---|---|
| नेहा | सायमन | उमा | शरद |
| इझाबेला | रमेश | सायरा | इसाक |

# २५. माझे कुटुंब

- प्रिया तिच्या कुटुंबाची ओळख करून देते. ती ऐका व म्हणा.



मी प्रिया.

हा माझा लहान भाऊ. त्याचे नाव पवन.

ही माझी आई. तिचे नाव जानकी.

हे माझे वडील. त्यांचे नाव किशोर.


ही माझी आजी. तिचे नाव राधिकाबाई.

हे माझे आजोबा. त्यांचे नाव दौलतराव.


- चित्रे ओळखा. त्यांची नावे पाहा. ऐका. म्हणा.




मी
प्रिया



भाऊ
पवन



आई
जानकी



वडील
किशोर



आजी
राधिकाबाई



आजोबा
दौलतराव

Z48R9R

# २६. माझे पान

- स्वत:चा फोटो, कुटुंबातील व्यक्तींचे फोटो चिकटवा. शिक्षकांच्या मदतीने नावे लिहा. खालील वाक्ये ऐका. म्हणा.

हा/ही मी आहे.

माझे नाव ..................... आहे.

ही माझी आई.

तिचे नाव ..................... आहे.

हे माझे वडील.

त्यांचे नाव ..................... आहे.

हा माझा भाऊ/बहीण.

त्याचे/तिचे नाव ..................... आहे.

ही माझी आजी.

तिचे नाव ..................... आहे.

हे माझे आजोबा.

त्यांचे नाव ..................... आहे.

Z4HHBE

# २७. चित्रात काय ?

• चित्रे पाहा. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते सांगा.







• एकेक वाक्य ऐका व म्हणा.

अमर, तो पक्षी बघ.

अमर, ती झोपडी बघ.

गुरुजी, ते घरटे बघा.

# २८. ओळखा पाहू !

Z51EEP

- फासा टाका. नावे सांगा. दाखवा.

१ फुले



२ फळे



३ प्राणी




४ पक्षी



५ दप्तर



६ खेळणी



## उद्दिष्टे

**विद्यार्थ्यांना पुढील उद्दिष्टे साध्य करण्यास मदत व्हावी, म्हणून पोषक वातावरण निर्माण करणे.**

१. सूचना ऐकून व ओळखून त्याप्रमाणे कृती करणे.
२. योग्य उच्चारांसह गाणी म्हणणे.
३. चित्रांच्या साहाय्याने गोष्ट सांगणे.
४. मराठी शिष्टाचार पाळणे.
५. स्वतःबद्दल आणि कुटुंबीयांबद्दल माहिती सांगणे.
६. ध्वनिभेद लक्षात घेऊन उच्चारण करणे.
७. सुमारे २५ दृक्शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.
८. सुमारे ५०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती विकसित करणे.
९. सुमारे १५० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती विकसित करणे.

## शिक्षकांसाठी - दिशा अध्ययन-अध्यापनाची

**प्रत्येक पाठाखाली दिलेल्या कृती क्रमाने घ्याव्या. याशिवाय आपल्या कल्पकतेने काही कृती वैयक्तिक तसेच गटागटांत घेता येतील.**

### १. सरी

१. शिक्षकांनी गाणे तालासुरात साभिनय म्हणावे.
२. विद्यार्थ्यांना गाण्यातील वस्तू चित्रांत ओळखण्यास सांगाव्या.
**जसे :** थेंब, सरी, गाडगे, मडके, मोर.
विद्यार्थ्यांना ओळखता न आल्यास या शब्दांशी संबंधित चित्रे स्वतः दाखवावी.
तसेच टप्टप्, सरसर, भरभर, थुईथुई या शब्दांशी संबंधित कृती करून दाखवाव्या. विद्यार्थ्यांकडून कृती व उच्चार करून घ्यावे.
३. गाण्याची एकेक ओळ तालासुरात साभिनय म्हणून दाखवावी. विद्यार्थ्यांना आपल्या मागे म्हणण्यास सांगावी.
४. गाणे वर्गासोबत, गटात, वैयक्तिक म्हणायला सांगावे.

### २. दोघेही जिंकू

१. विद्यार्थ्यांना प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते विचारावे.
**जसे :** चित्रांतील पात्रे, प्रसंग. (पात्रे, प्रसंग हे शब्द शिक्षकांसाठी आहेत.)
२. विद्यार्थ्यांना सांगता न आल्यास पात्रांची नावे व प्रसंग चित्रात दाखवून सांगावे.
**जसे :** चित्र क्र. १ पात्रे - बदक व कुत्र्याचे पिल्लू.
**प्रसंग :** कुत्र्याचे पिल्लू आणि बदक पळत आहेत.
विद्यार्थ्यांकडून एकेक वाक्य म्हणून घ्यावे.
३. वरीलप्रमाणे चित्र क्र. २ ते ४ साठी अशाच कृती करून घ्याव्या.
४. 'बदक व कुत्र्याचे पिल्लू नदीतून बाहेर आल्यानंतर पुढे काय झाले असेल ?' हा प्रश्न रिकामी चौकट दाखवून विचारावा. या रिकाम्या चौकटीत कोणते चित्र असावे यावर चर्चा करावी.
५. सर्व चित्रांच्या मदतीने गोष्ट सांगावी. गोष्टीतील एकेक वाक्य स्वतः सांगावे. विद्यार्थ्यांना मागे म्हणण्यास सांगावे. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना चित्रांच्या मदतीने गोष्ट सांगायला सांगावी. गोष्ट खालीलप्रमाणे -

एक होते बदक. एक होते कुत्र्याचे पिल्लू. दोघे मित्र होते. एकदा दोघांची पळण्याची शर्यत लागली. कुत्र्याचे पिल्लू पळत पुढे गेले. बदक त्याच्यामागे हळूहळू चालत निघाले. रस्त्यात होती नदी. नदी कशी पार करायची ते पिल्लाला समजेना. ते नदीच्या तीरावर थांबले.

बदक चालत चालत तिथे पोहोचले. त्याने कुत्र्याच्या पिल्लाची अडचण ओळखली. बदक पिल्लाला म्हणाले, 'तू बस माझ्या पाठीवर. आपण पलीकडे जाऊ.' दोघांनी नदी पार केली.

इथपर्यंत गोष्ट सांगून, 'पुढे काय झाले असेल?' असा प्रश्न विचारावा. मुलांना मुक्तपणे बोलू द्यावे. शेवटी गोष्टीचा उरलेला भाग सांगावा.

कुत्र्याच्या पिल्लाच्या मनात आले, 'मी पुढे धावत गेलो तर मी जिंकेन, पण बदकानं मला नदी पार करायला मदत केली. त्यानं नदी पार करायला मदत केली नसती, तर मी जिंकलो नसतो.'

कुत्र्याच्या पिल्लाने विचार केला. त्याने बदकासोबत शर्यतीच्या ठिकाणी जायचे ठरवले. दोघे बरोबरच तेथे पोहोचले.

सांगा बरे, कोण जिंकले ?

## ३. करूया स्वागत

१. चित्र क्र. १, २ विद्यार्थ्यांना दाखवावी. प्रत्येक चित्रासंबंधी प्रश्न विचारावे. चित्रांसंबंधीची माहिती द्यावी.

**जसे :**

| **चित्र १** | **चित्र २** |
|---|---|
| वर्गात कोण कोण आहेत ? | घरात कोण कोण आहे ? |
| गुरुजी काय करत आहेत ? | दारातून कोण कोण येत आहेत ? |
| गुरुजी काय म्हणत आहेत ? | आई व मुलगी काय म्हणत आहेत ? |
| मुले काय करत आहेत ? | घरात सर्वजण का जमले आहेत ? |
| मुले काय म्हणत आहेत ? | हे तुम्ही कसे ओळखले ? |
| तुम्ही वर्गात येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत कसे करता ? काय म्हणता ? | तुमचा वाढदिवस तुम्ही कसा साजरा केला ? |

२. उत्तर देण्यासाठी आवश्यकतेनुसार मराठी शब्द विद्यार्थ्यांना सांगावे. विद्यार्थ्यांच्या मदतीने वर्गातील, घरातील अभिवादनाच्या प्रसंगांचे सादरीकरण घ्यावे.

३. दररोज वर्गात गेल्यानंतर अभिवादन घ्यावे.

४. वेगवेगळ्या ठिकाणी अभिवादन कसे करावे, काय म्हणावे याचे विद्यार्थ्यांच्या मदतीने सादरीकरण घ्यावे.

**जसे :** पाहुण्यांच्या घरी गेल्यानंतर, बसस्थानक, रेल्वेस्थानक, दुकान अशा ठिकाणी चौकशी करण्यासाठी गेल्यानंतर.

## ४. खेळ खेळूया

१. विद्यार्थ्यांना प्रत्येक चित्रात कोण काय करत आहे ते विचारावे.

२. प्रत्येक चित्रातील बलूनमधील शब्द विद्यार्थ्यांना दाखवावा. शब्द वाचावा. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावा.

३. विद्यार्थ्यांना मैदानावर गोलाकार उभे करावे.

'पळा' ही शब्दपट्टी दाखवावी. शब्द वाचावा. विद्यार्थ्यांना गोलाकार पळण्यास सांगावे.

'थांबा' अशी सूचना द्यावी. हाताने 'थांबा'ची खूण करावी. विद्यार्थी थांबल्यानंतर 'थांबा' ही शब्दपट्टी दाखवावी. शब्द वाचावा. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावा. याप्रमाणे 'टाळी वाजवा', 'हसा' या कृती घ्याव्या.

४. सूचना ऐकून तसेच शब्दपट्टी पाहून, गटात कृती करण्याचा सराव घ्यावा.

## ५. ऐकूया, करूया

१. विद्यार्थ्यांना प्रत्येक चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.

२. प्रत्येक चित्रात कोण काय करत आहे ते विचारावे. चित्राप्रमाणे क्रिया करण्यास सांगावी.

उदा., पहिल्या चित्रात मुलगी हसत आहे. (विद्यार्थी हसतात.)

३. चित्राखालील शब्द मुलांना पाहण्यास सांगावा. तो शब्द वाचून दाखवावा. मुलांकडून वाचून घ्यावा.

४. वरीलप्रमाणे प्रत्येक चित्रातील क्रिया ओळखण्याचा, क्रिया करण्याचा व क्रियेचे नाव वाचण्याचा सराव घ्यावा.

५. विद्यार्थ्यांना क्रियेचे नाव सांगावे. त्या क्रियेचे चित्र व नाव दाखवण्यास सांगावे.

**जसे :** उभे राहा – पहिल्या ओळीतील दुसरे चित्र.

६. क्रियेचे चित्र पाहून त्याखालील नाव वाचण्याचा व तशी क्रिया करण्याचा सराव गटात घ्यावा.

७. क्रियेच्या नामपट्ट्या तयार कराव्या. पुस्तकातील योग्य चित्राशेजारी ठेवण्यास सांगाव्या.

## ६. घंटा वाजे

१. शिक्षकांनी गाणे तालासुरात साभिनय म्हणावे.

२. गाण्यातील वाद्ये शाळेत असल्यास ती वर्गात आणावी. प्रत्येक वाद्य वाजवून दाखवावे. त्याचे नाव व आवाजाचा शब्द फलकावर लिहावा. तो वाचून दाखवावा.

**जसे** : ढोल – ढुम् ढुम् ढुम्.

३. विद्यार्थ्यांना वाद्य वाजवण्याची संधी द्यावी. वाद्याचे नाव, आवाजाचा शब्द ओळखून (फळ्यावरील) तो दाखवण्यास सांगावा.

४. वाद्याचे नाव किंवा आवाजाचा शब्द सांगितल्यास पुस्तकातील चित्रात ते वाद्य ओळखून दाखवण्यास सांगावे.

५. चित्र पाहून त्याशेजारील वाद्याचे नाव वाचण्यास सांगावे.

६. गाण्याची एकेक ओळ तालासुरात साभिनय म्हणावी. विद्यार्थ्यांना आपल्या मागे म्हणण्यास सांगावी.

७. गाणे तालासुरात साभिनय म्हणण्याचा सराव गटात घ्यावा.

## ७. चतुर कावळा

१. विद्यार्थ्यांना एकेका चित्रात काय काय दिसते ते विचारावे.

(चित्रातील पात्रे, वस्तू, प्रसंग. **जसे** : पहिल्या चित्रात कावळा आहे. कावळा माठाच्या काठावर बसला आहे. तो माठात पाहत आहे. चित्रात कावळा, माठ दाखवावे.) याप्रमाणे प्रत्येक चित्राचे वर्णन करण्यास विद्यार्थ्यांना मदत करावी.

२. प्रत्येक चित्रासंबंधी प्रश्न विचारावे.

**जसे** : **चित्र १** – कावळा माठाजवळ का आला असेल?
– कावळा माठात काय पाहत असेल?

**चित्र २** – कावळा काय पाहत आहे?
– कावळ्याच्या मनात काय आले असेल?
– चित्रात दिव्याचा प्रकाश का दाखवला असेल?

**चित्र ३** – कावळ्याने नळी (स्ट्रॉ) चोचीत का उचलून घेतली ?

**चित्र ४** – कावळ्याने स्ट्रॉचा उपयोग कशासाठी केला?

३. विद्यार्थ्यांनी चित्रांसंबंधी सांगितलेली माहिती व प्रश्नांची दिलेली उत्तरे यांच्या मदतीने शिक्षकांनी गोष्ट सांगावी. विद्यार्थ्यांना चित्रे क्रमाने पाहून गोष्ट सांगण्यास सांगावे.

४. स्ट्रॉचा उपयोग तुम्ही पाहिला का? स्वतः उपयोग केला का? कोठे कोठे उपयोग केला?

५. कावळ्याच्या जागी तुम्ही असता, तर माठातील पाणी कसे प्यायला असता?

६. वस्तू, पात्रे यांच्या नावांच्या पट्ट्या शिक्षकांनी तयार कराव्या. पुस्तकातील योग्य चित्राशेजारी ठेवण्यास विद्यार्थ्यांना सांगाव्या.

**गोष्ट** : एक होता कावळा. त्याला लागली तहान. त्याला एक माठ दिसला. तो माठावर येऊन बसला. माठात पाणी कमी होते. चोच पाण्यापर्यंत पोहचत नव्हती. तेथून कावळा उडाला.

त्याला नारळपाणी पीत असलेला मुलगा दिसला. तो नळीने नारळपाणी पीत होता. कावळ्याला युक्ती सुचली. त्याने एक नळी (स्ट्रॉ) उचलून आणली. माठावर बसला. चोचीत नळी धरली. चोचीने पाणी ओढले. त्याची तहान भागली.

## ८. जोडीदार शोधा

१. विद्यार्थ्यांना चित्रांतील वस्तू ओळखण्यास सांगाव्या.

२. विद्यार्थ्याने सांगितलेला शब्द (नाव) पुस्तकात दाखवावा. तो वाचून दाखवावा. त्यांच्याकडून वाचून घ्यावा.

३. बारा-बारा विद्यार्थ्यांचे दोन गट करावे. एका गटातील प्रत्येक विद्यार्थ्यास एका वस्तूचे चित्र किंवा वस्तू द्यावी. दुसऱ्या गटातील एकेका विद्यार्थ्याकडे एकेक नामपट्टी द्यावी. एका गटातील एका विद्यार्थ्याने चित्र किंवा वस्तू दाखवल्यास दुसऱ्या गटातील

विद्यार्थ्यांने नाव ओळखून आपल्याजवळील नामपट्टी दाखवावी. त्याच्या शेजारी जाऊन उभे राहावे. वर्गाला वस्तू व नामपट्टी दाखवावी. नाव वाचून दाखवावे.

४. याप्रमाणे बारा वस्तूंची नावे ओळखेपर्यंत कृती चालू ठेवावी.

५. स्वतःच्या पुस्तकात वस्तूंची चित्रे व त्यांची नावे यांच्या जोड्या पेन्सिलीने लावण्यास (रेघ ओढून) सांगाव्या.

६. चित्राखालील सर्व शब्द वाचून घ्यावे.

## ९. माझा हात

१. गाणे तालासुरात साभिनय म्हणून दाखवावे.

२. गाण्यातील दात घासणे, खाऊ खाणे, दार उघडणे, कचरा काढणे या कृती करून दाखवाव्या. विद्यार्थ्यांकडून एक-एक कृती करून घ्यावी.

३. गाण्यातील एकेक कृती चित्रात दाखवण्यास सांगावी. गाण्याखालील चित्रातील कृती ओळखण्यास सांगाव्या.

४. 'तुम्ही हातांनी कोणकोणती कामे करता', असे विचारावे. त्या कामांचा अभिनय करून दाखवण्यास सांगावे.

५. गाण्याची एकेक ओळ तालासुरात साभिनय म्हणून दाखवावी. विद्यार्थ्यांना मागे म्हणण्यास सांगावे.

६. दोन-दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या कराव्या. प्रत्येकास गाण्याच्या ओळी ठरवून द्याव्या. एकाने पहिल्या दोन ओळी साभिनय म्हटल्यानंतर दुसऱ्यास त्यापुढील दोन ओळी म्हणायला सांगाव्या. याप्रमाणे जोडी-जोडीकडून गाणे साभिनय म्हणून घ्यावे.

## १०. पाहूया, सांगूया

१. शिक्षकांनी स्वतःचा एकेक अवयव दाखवून त्याचे नाव सांगावे. ते फळ्यावर लिहावे. वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे.
**जसे** : डोळे, नाक, कान.

२. एका-एका अवयवाचे नाव उच्चारावे. विद्यार्थ्यांना स्वतःचा तो अवयव दाखवण्यास सांगावा. त्याच वेळी त्या अवयवाचे नाव उच्चारण्यास सांगावे.

३. विद्यार्थ्यांना एकेका चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. प्रत्येक चित्रात कोण काय करत आहे, कोणत्या अवयवाचा उपयोग केला आहे ते विचारावे. उत्तर देण्यास गरजेनुसार मराठी शब्द सांगावे.

४. एकेका अवयवाचे चित्र पाहून शेजारील नाव वाचण्यास सांगावे. त्या अवयवाचे काम सांगावे.

५. चित्रातील कामाशिवाय प्रत्येक अवयवाचे एकेक काम विद्यार्थ्यांना विचारावे. ते काम अभिनय करून दाखवण्यास सांगावे.

## ११. कशासाठी, कोणते अवयव ?

१. विद्यार्थ्यांना चौकटींतील शब्द वाचण्यास सांगावे.

२. चित्रांतील वस्तू, कामे ओळखण्यास सांगावे. कामे, वस्तू ओळखण्यास विद्यार्थ्यांना मदत करावी. (गरजेनुसार मराठी शब्द सांगावे.)

३. कोणत्या कामासाठी, कोणते अवयव ? असा प्रश्न प्रत्येक वस्तू/ कामाबद्दल विचारावा. उदाहरणादाखल खालीलप्रमाणे.
**जसे** : तोंड, कान, हात.




हातात मोबाइल धरणे, कानाने दुसऱ्याचे बोलणे ऐकणे,
तोंडाने त्याच्याशी बोलणे/ उत्तर देणे.



आई पेपर वाचते - डोळे, हात.
हातात पेपर धरणे, डोळ्यांनी वाचणे.
मोठ्याने वाचल्यास तोंडाचाही वापर होतो.



४. प्रत्येक अवयवाची चित्रातील कामाशिवाय इतर कामे विचारावी.

५. विद्यार्थ्यांना पाच चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. प्रत्येक चित्रात कोण काय करत आहे व त्या कामासाठी कोणकोणत्या अवयवांचा वापर होतो ते विचारावे.

## १२. ओळख आपल्या वर्गाची

१. वर्गातील वस्तूंच्या नामपट्ट्या तयार कराव्या.

२. विद्यार्थ्यांना वर्गाचे निरीक्षण करायला सांगावे. वर्गातील एकेका वस्तूकडे बोट दाखवून नाव विचारावे. विद्यार्थ्याने नाव सांगितल्यानंतर त्याच्याकडे नामपट्टी द्यावी. ती त्या वस्तूजवळ ठेवून नाव वाचण्यास सांगावे.

३. वर्गाचे वर्णन करावे. एकेक वाक्य विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावे.

४. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात काय काय दिसते ते विचारावे. चित्राचे वर्णन करण्यास विद्यार्थ्यांना मदत करावी.

५. विद्यार्थ्यांना चौकटींतील चित्रे ओळखण्यास सांगावी. त्यांखालील नावे वाचून दाखवावी. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावी.

६. विद्यार्थ्यांना त्यांच्या दप्तरातील वस्तूंच्या नामपट्ट्या तयार करून द्याव्या. दप्तरातील एकेक वस्तू बाजूला काढून, मांडून ठेवण्यास सांगावी. त्या वस्तूशेजारी नामपट्टी ठेवण्यास सांगावी. गरजेनुसार नामपट्टी ओळखण्यास विद्यार्थ्यांना मदत करावी.

## १३. झाडे लावूया

१. विद्यार्थ्यांना प्रत्येक चित्राचे निरीक्षण करायला सांगावे.

२. प्रत्येक चित्रातील एकेक वस्तू दाखवून तिचे नाव सांगावे.

३. प्रत्येक चित्रात कोण कोण आहेत, ते काय करत आहेत ते विचारावे.

४. प्रत्येकाच्या घरी कोणकोणती झाडे/वेली आहेत ते विचारावे. त्यांची ते कशी काळजी घेतात, याविषयी त्यांच्याशी गप्पा माराव्या. प्रत्येक विद्यार्थ्याला एक झाड लावण्यास सांगावे.

## १४. ओळखा माझा रंग

१. विद्यार्थ्यांना एकेका गटातील वस्तू ओळखण्यास सांगावे. त्यांचे रंग विचारावे. वस्तू ओळखण्यास गरजेनुसार मदत करावी.

२. विद्यार्थ्यांना रंग ओळखण्यास सांगावे. रंगाखाली दिलेली नावे वाचून दाखवावी. वाचून घ्यावी.

३. दिलेल्या रंगांच्या कोणकोणत्या वस्तू/प्राणी/पक्षी त्यांनी पाहिले आहेत ते विचारावे.

## १५. गमतीजमती

१. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते विचारावे.

२. प्रत्येक चित्रातील गंमत ओळखण्यास सांगावी. गंमत ओळखण्यास मदत करावी.

**जसे** : दुसऱ्या स्तंभातील दुसरे चित्र - कासव आकाशात उडत नाही.

३. अशी गमतीची चित्रे काढण्यास किंवा गमतीजमती सांगण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.

४. चौकटींतील चित्रे ओळखण्यास सांगावी. चित्रांखालील नावे वाचून दाखवावी. विद्यार्थ्यांकडून नावे वाचून घ्यावी.

## १६. ओळख फळांची

१. विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे.

२. चित्रांची नावे ओळखण्यास मदत करावी. (मराठी शब्द सांगावे.)

३. फळ आणि फळाचे झाड यांची जोडी बोटाने दाखवण्यास सांगावी.

४. दाखवलेल्या जोडीतील फळाचे व झाडाचे नाव वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे.

५. झाड व फळ यांची नावे रेघेने जोडण्यास सांगावी.

६. कोणती फळे खाल्ली, कोणती फळझाडे पाहिली, कोठे पाहिली यांविषयी विद्यार्थ्यांशी गप्पा माराव्या.

७. विद्यार्थ्यांनी सांगितलेल्या फळांच्या नावांच्या पट्ट्या (नामपट्ट्या) विद्यार्थ्यांना द्याव्या. त्यांच्याकडून वाचून घ्याव्या.

## १७. दे रे भाऊ, माझा खाऊ

१. गाणे तालासुरात साभिनय म्हणून दाखवावे.

२. गाण्यातील पक्षी, प्राणी चित्रात दाखवण्यास विद्यार्थ्यांना सांगावे.

३. गाण्यातील एकेका पक्ष्याचा, प्राण्याचा आवाज काढून दाखवावा. विद्यार्थ्यांना आवाज काढण्यास सांगावे.

४. चित्रात काय काय दिसते ते विचारावे.

५. कोणत्या पक्ष्याचा/प्राण्याचा खाऊ कोणता याविषयी गप्पा माराव्या.

६. गाण्याची एक-एक ओळ तालासुरात साभिनय म्हणून दाखवावी. नंतर विद्यार्थ्यांना ती ओळ म्हणण्यास सांगावी.

७. एकेका विद्यार्थ्यास एक-एक कडवे याप्रमाणे विद्यार्थ्यांकडून कविता म्हणून घ्यावी.

## १८. पक्ष्यांचे जग

१. पक्ष्याचे नाव व आवाज यांच्या शब्दपट्ट्या व पक्ष्यांच्या चित्रांची कार्डे तयार करावी.

२. एका विद्यार्थ्यास पक्ष्याच्या चित्राचे कोणतेही एक कार्ड दाखवण्यास सांगावे. त्या वेळी त्याचे नाव विचारावे. शिक्षकांनी पक्ष्यांच्या नावाची व आवाजाची शब्दपट्टी फ्लॅनेल बोर्डवर लावावी किंवा फलकावर हे शब्द लिहावे. वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे. याप्रमाणे सर्व पक्ष्यांच्या चित्रांसाठी क्रमाक्रमाने कृती करावी.

३. पक्ष्याचे चित्र, त्याचे नाव, त्याचा आवाज या तीनपैकी एक कार्ड किंवा शब्दपट्टी दाखवल्यास, विद्यार्थ्यास इतर दोन शब्दपट्ट्या किंवा चित्रकार्ड दाखवण्यास सांगावे.

४. पक्ष्याचा आवाज ऐकून त्याचे चित्र, नाव, आवाज यांच्या शब्दपट्ट्या शोधून दाखवण्यास सांगाव्या.



## १९. ओळख प्राण्यांची

१. एकेका विद्यार्थ्यास त्याच्या पुस्तकातील प्राण्यांची चित्रे ओळखण्यास सांगावे.

२. त्याने ओळखलेल्या प्राण्याचे नाव फलकावर लिहावे. वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे.

३. विद्यार्थ्यांचे तीन गट करावे. खालील सारणीत दाखवल्याप्रमाणे प्रत्येक प्राण्यासाठी दोन चित्रकार्डे व एक शब्दपट्टी द्यावी.
गट १ कडे नावासह चित्र, गट २ कडे फक्त चित्र, गट ३ कडे फक्त नामपट्टी द्यावी.

### सारणी

| गट १ | गट २ | गट ३ |
|---|---|---|
|  गाय |  | गाय |

## २०. प्राण्यांचे जग

प्राण्यांची चित्रे, नावे व आवाज यांच्या शब्दपट्ट्या तयार कराव्या. पाठ १८ प्रमाणे सर्व कृती करून घ्याव्या.

## २१. आम्हांलाही खेळायचंय

१. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात कोण काय करत आहे ते विचारावे.

२. चित्रातील प्राणी ओळखण्यास व दाखवण्यास सांगावे. विद्यार्थ्यांनी ओळखलेल्या प्राण्याचे नाव फलकावर लिहावे. वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे.

३. शक्य असल्यास मुलांना प्राण्यांचे मुखवटे देऊन त्यांना प्राण्यांप्रमाणे हालचाल करण्यास/आवाज काढण्यास सांगावे. मुखवटे घालून त्यांची फुटबॉल मॅच घ्यावी.

४. एका विद्यार्थ्यास त्याच्याजवळील चित्रकार्ड वर्गाला दाखवण्यास सांगावे. चित्राचे नाव विचारावे. याप्रमाणे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या हातांत प्राण्यांची चित्रकार्डे देऊन नावे विचारावी.

५. विद्यार्थ्यांना पाठातील प्राण्यांची नावे विचारावी.

## २२. आरसा रडला, आरसा हसला

१. विद्यार्थ्यांना दोन्ही चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे.

२. प्रत्येक चित्राविषयी बोलण्यास सांगावे. वर्णन करण्यासाठी गरजेनुसार मराठी शब्द सांगावे.

३. दोन-दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या कराव्या. एकमेकांसमोर तोंडे करून उभे राहण्यास सांगावे. जोडीतील प्रत्येकाला आरशाची भूमिका द्यावी. एका जोडीस वर्गापुढे येण्यास सांगावे. समोरच्या विद्यार्थ्याला पाहून आरसा काय बोलेल, ते त्यास बोलण्यास सांगावे. प्रत्येक जोडीचे सादरीकरण करून घ्यावे.

५. शक्य असल्यास वर्गात आरसा आणून प्रत्येक विद्यार्थ्याला आरशासमोर उभे करून तो कसा दिसतो ते विचारावे.

## २३. माझी ओळख

१. विद्यार्थ्यांना शाळेच्या गेटसमोर घेऊन जावे. गेटवरील शाळेच्या नावाची पाटी दाखवावी. शाळेचे नाव वाचून दाखवावे. मागून म्हणण्यास सांगावे. नंतर शाळेकडे बोट करून 'ही माझी शाळा' असे म्हणावे. विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावे.

२. विद्यार्थ्यांना वर्गात घेऊन जावे. 'हा माझा वर्ग' असे म्हणावे. विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावे.

३. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात काय काय आहे, कोण कोण आहे, कोण काय म्हणत आहे हे विचारावे.

४. चित्राचे वर्णन स्वतः करावे. एकेक वाक्य विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावे.

५. पुस्तकात दाखवल्याप्रमाणे चार वाक्ये मोठ्या अक्षरांत फलकावर लिहावी. वाक्ये वाचून दाखवावी. शिक्षकांनी स्वतःचे नाव वापरून चार वाक्ये वाचून दाखवावी. एकेका विद्यार्थ्यास फलकाजवळ बोलावून, स्वतःचे नाव वापरून ही चार वाक्ये म्हणून घ्यावी. गरजे-नुसार स्वतः वाक्ये सांगून विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावी.

## २४. माझे मित्र

१. वर्गातील विद्यार्थ्यांच्या नामपट्ट्या तयार कराव्या.

२. प्रत्येक विद्यार्थ्याकडे त्याची नामपट्टी द्यावी. त्याची नामपट्टी वाचून दाखवावी. त्याच्याकडून वाचून घ्यावी.

३. दोन मुले व दोन मुली असे चार-चार विद्यार्थ्यांचे गट करावे.

४. गटातील विद्यार्थ्यांना गोलाकार बसवावे. त्यांच्यासमोर त्यांच्या नामपट्ट्या ठेवाव्या. स्वतःची नामपट्टी गटातील सर्वांना दाखवून, वाचून दाखवण्यास सांगावी. गटांतील नामपट्ट्या एकत्र कराव्या. त्यांतील स्वतःची नामपट्टी ओळखण्यास सांगावी. विद्यार्थ्यांचे गट बदलून वरीलप्रमाणे कृती घ्यावी.

५. विद्यार्थ्यांना पुस्तकातील दोन्ही चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांत काय काय दिसते ते विचारावे.

६. विद्यार्थ्यांना चित्रांतील तसेच चौकटींतील नामपट्ट्या पाहण्यास सांगाव्या. प्रत्येक नामपट्टीवरील नाव वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे.

## २५. माझे कुटुंब

१. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात कोण कोण, काय काय करत आहे ते विचारावे.

२. चित्रात प्रियाचे कुटुंब दाखवले आहे. हे पृष्ठ विद्यार्थ्यांना दाखवत प्रियाच्या कुटुंबातील व्यक्तींची ओळख करून द्यावी.

**जसे :**  – ही प्रिया. प्रिया पुस्तक वाचत आहे.

 – हे प्रियाचे आजोबा. आजोबा वर्तमानपत्र वाचत आहेत.

३. आता 'प्रिया तिच्या कुटुंबाची ओळख कशी करून देईल', असा प्रश्न विचारावा. हे पृष्ठ विद्यार्थ्यांना दाखवावे. चित्राकडे बोट दाखवत एकेक वाक्य वाचावे. विद्यार्थ्यांना मागून म्हणायला सांगावे.

४. प्रियाच्या कुटुंबातील व्यक्तींची नावे व नात्यांच्या नामपट्ट्या तयार कराव्या. त्या वाचून दाखवाव्या.

५. चित्रांखालील नामपट्ट्या वाचून दाखवाव्या. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्याव्या.

६. गटागटांत या नामपट्ट्या द्याव्या. आपल्या पुस्तकात चित्राखाली या नामपट्ट्या ठेवण्यास सांगाव्या.

७. एक-दोन विद्यार्थ्यांच्या कुटुंबांतील व्यक्तींची व नात्यांची नावे फळ्यावर लिहावी. ती वाचून दाखवावी. वाचून घ्यावी.

## २६. माझे पान

१. विद्यार्थ्यांना कुटुंबांतील व्यक्तींचे फोटो वर्गात आणायला सांगावे.

२. विद्यार्थ्यांना गटागटांत बसवावे. गटातील एका विद्यार्थ्याच्या पुस्तकात त्याच्या कुटुंबातील व्यक्तींचे फोटो चिकटवावे. त्या विद्यार्थ्यास विचारून कुटुंबातील व्यक्तींची नावे रिकाम्या जागी लिहावी. कोणाचा फोटो कोठे चिकटवला हे सांगावे. नंतर गटातील सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पुस्तकांत फोटो चिकटवण्यास सांगावे. गरजेनुसार मदत करावी.

३. याप्रमाणे प्रत्येक गटासाठी कृती करावी.

४. सर्व विद्यार्थ्यांच्या पुस्तकांत त्यांच्या कुटुंबांतील व्यक्तींची नावे लिहावी.

५. एका मुलाचे व एका मुलीचे पुस्तक सर्वांना दाखवत एकेक वाक्य वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांना मागून म्हणण्यास सांगावे.

## २७. चित्रात काय ?

१. विद्यार्थ्यांना प्रत्येक चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात कोण कोण आहेत, काय करत आहेत ते विचारावे.

२. चित्रांतील व्यक्ती, वस्तू, पक्षी विद्यार्थ्यांना दाखवत त्यांची ओळख करून द्यावी. **जसे** : व्यक्ती-शिक्षक, मुलगी, मुलगा तसेच पक्षी, घरटे, झाड, फांदी.

३. पुस्तकातील वाक्ये फलकावर जशीच्या तशी लिहावी. एकेक वाक्य विद्यार्थ्यांना दाखवत वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांना मागून म्हणण्यास सांगावे.

४. वर्गातील एकेक वस्तूकडे बोट दाखवत एकेक वाक्य सांगावे. विद्यार्थ्यांना मागून म्हणायला सांगावे. **जसे** : जवळचे टेबल दाखवत- हे टेबल. दूरची खिडकी दाखवत - ती खिडकी.

## २८. ओळखा पाहू !

१. विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांत काय काय दिसते ते विचारावे.

२. चित्रे दाखवत त्यांच्याशी संबंधित शब्द वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे. चित्रांतील एकेक वस्तू दाखवत नावे सांगावी. विद्यार्थ्यांकडून नावे म्हणून घ्यावी. वस्तूंच्या नामपट्ट्या तयार कराव्या. त्या वस्तूशेजारी ठेवण्यास सांगाव्या.

३. पृष्ठावर दाखवल्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या गटांच्या संख्येइतके फासे तयार करावे.


४. चार-चार विद्यार्थ्यांचे गट करावे. गटांत गोलाकार बसवावे. मध्यभागी हे पृष्ठ ठेवावे. गटात एकेक फासा द्यावा. प्रत्येक गटाला कसे खेळावे हे सांगावे.

### खेळण्याची पद्धत


* एका विद्यार्थ्याने दोन्ही हातांत फासा धरावा. हात बंद ठेवून फासा हलवावा. फासा जमिनीवर टाकावा.
* फाशाच्या वरच्या पृष्ठावरील ठिपके मोजावे.

  २ ठिपके आहेत. ② क्रमांकाची 'चौकट' पाहावी.

  तेथील शब्द वाचावा. त्या चौकटीतील चित्रे ओळखून नावे सांगावी.
* गटातील प्रत्येक विद्यार्थ्यास क्रमाने खेळण्याची संधी द्यावी.
* प्रत्येक विद्यार्थ्याची प्रत्येक चौकट वाचून होईपर्यंत खेळ चालू ठेवावा.



फासा




**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

अमराठी माध्यमांच्या शाळांकरीता
पाठ्येतर पूरक पुस्तिका इ.१ली

₹ ३१.००